जगभर

# म्यानमार, येमेन

## पुरन्दरे चन्द्रशेखर

**येमेन**

**पार्श्वभूमी**

जगातील अतिशय अशांत व हिंसक देशांमध्ये येमेन आहे. लोकसंख्या सुमारे पावणेतीन कोटी. प्रमुख धर्म इस्लाम, त्यात सुन्नी सुमारे ६५-७० टक्के, उरलेले शिया. हा देश सौदी अरेबियाच्या दक्षिणेला आहे. लाल समुद्र, एडनची सामुद्रधुनी व अरबी समुद्र त्याला लागून आहेत. [नकाशा]. तेथील हिंसाचार व असंतोष गेले निदान वीस वर्षे तरी अखंड चालू आहेत. २०११च्या 'अरब वसंतात' इतर अरब देशांतील जनतेप्रमाणे येमेनी जनता सरकारविरोधात रस्त्यावर आली. तोपर्यंत अली सालेह या हुकूमशहाची तेहेतीस वर्षे सत्ता होती. त्याने सत्ता सोडावी ही विरोधकांची राजकीय मागणी होती पण त्यामागे अतिशय दारिद्र्य, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार ही आर्थिक कारणे होती. अखेर अली सालेह पदच्युत झाला, नवा अध्यक्ष आला, पण आज तो केवळ नामधारी अध्यक्ष आहे. केंद्रसत्ता दुबळी झाल्यावर अनेक दबलेले हितसंबंध आणि परकीय हस्तक्षेप पुढे आले.

**अंत:प्रवाह**

येमेनच्या सद्यस्थितीला अनेक मुख्य प्रवाह कारणीभूत आहेत. एक धर्म-पंथीय वैर. येमेनमध्ये झैदी म्हणून शिया पंथीय जमात आहे. [ती हूथी म्हणून ओळखली जाते.] राजवट सुन्नी. ते एकमेकांविरुद्ध. दुसरा प्रवाह म्हणजे उत्तर येमेन व दक्षिण येमेन यांच्यातील तणाव. १९९० पर्यंत हे दोन स्वतंत्र देश होते. उत्तर येमेन सौदीच्या व इस्लामच्या प्रभावाखाली होता तर दक्षिण येमेन धर्मनिरपेक्ष व रशियाच्या प्रभावाखाली होता. त्यांच्यात युद्धे झाली, मग ते एकत्र आले व आताचा येमेन जन्माला आला. म्हणजे पूर्णत: भिन्न आदर्शवाद, संस्कृतीच्या लोकांची मोट बांधली गेली. अधिकृतरीत्या देश एक झाला म्हणजे लोक एक होतात असे जगात दिसत नाही. [त्याचप्रमाणे, देशाची फाळणी झाली तरी लोक आपापल्या देशात गुण्यागोविंदाने नांदतात, असेही दिसत नाही [भारत-पाकिस्तान, सुदान, इथिओपिया]]. हे ऐतिहासिक प्रवाह. अलीकडचा एक घटक म्हणजे अल कईदाचा व इस्लामिक स्टेटचा येमेनमधील उदय आणि त्यांचे येमेनमधील जमातींशी तणावपूर्ण संबंध. यांचा प्रभाव अलीकडे कमी दिसला तरी समाज अस्थिर करण्याची त्यांची उपद्रवशक्ती कमी लेखता येत नाही. देशात एकाहून जास्त सत्ताकेंद्रे आहेत व अफगाणिस्तानसारखाच येमेन पोखरलेला आहे. त्यात भर म्हणून सध्याचे युद्ध आणि त्यामुळे येऊ घातलेला प्रचंड दुष्काळ.

**युद्ध**

सुन्नी वर्चस्वाविरुद्ध हूथी जमातीने सशस्त्र उठाव सुरू ठेवला. आजमितीला राजधानी साना, इतर काही महत्त्वाची बंदरे आतापर्यंत त्यांच्या ताब्यात होती. ते शिया असल्याने इराण या मध्यपूर्वेतील बलिष्ठ शिया देशाची या उठावाला थोडीफार मदत आहे. त्याविरुद्ध सुन्नींच्या बाजूला मध्यपूर्वेतील दुसरा बलिष्ठ देश सौदी अरेबियाचा पाठिंबा आहे. या बाजूच्या म्हणण्याप्रमाणे युद्ध इराणला काबूत ठेवण्यासाठी आहे. पण इराणचा सहभाग अतिशयोक्त करणे या बाजूला राजकीय फायद्याचे आहे. त्यामुळे इराण-सौदी ही पडद्यामागची दुश्मनी येमेनमध्ये येमेनी जनतेच्या जीवावर [अक्षरश:] चालू आहे असे चित्र उभे राहते. पण हा सौदीचा विस्तारवाद दिसतो. २०१५ मध्ये सौदी अरेबियाच्या नेतृत्वाने अनेक देशांच्या आघाडीने हूथींविरुद्ध येमेनमध्ये लष्करी कारवाई सुरू केली, या आघाडीत एमिरेट्स, इजिप्त, सुदान, जॉर्डन, बहारीन, वगैरे देश. अमेरिकेने सौदीच्या युद्धखोरीला पाठिंबा दिला. हूथींच्या अमलाखालील प्रदेशावर बेफाम

बॉम्बहल्ले, त्या प्रदेशाची अन्न, औषधे व इतर जीवनावश्यक गोष्टी यांची रसद तोडणे हे या कारवाईचे स्वरूप. विशेषत: गर्दीच्या ठिकाणावर बॉम्ब टाकले जातात - बाजार, लग्न समारंभ, मिरवणुकी इत्यादि, जेणेकरून जीवितहानी जास्त होईल. आंतरराष्ट्रीय संकेतांनुसार हॉस्पिटल्सवर बॉम्ब टाकू नयेत. ते जुमानले जात नाही. युद्धामुळे सामान्य माणसाचे दैनंदिन जीवनच अशक्य झाले आहे. शुद्ध पाणीपुरवठा नाही; रस्ते, आरोग्यसेवा कोलमडल्या आहेत. कॉलरा, diptheria, measles या टाळता येणाऱ्या विकारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. औषधे नसल्याने अशा रुग्णांना हॉस्पिटल्स दाखल करून घेत नाहीत. देशात दर दहा मिनिटाला एक मूल या विकाराने दगावते. जे विकारातून वाचतात, ते बॉम्बस्फोटाचे बळी होऊ शकतात किंवा कुपोषणाचे शारीरिक व मानसिक परिणाम [खुंटलेली बौद्धिक व शारीरिक वाढ] आयुष्य-भरासाठी त्यांच्या पुढ्यात असतात. मागच्या वर्षापेक्षा या वर्षी गंभीर आजारी लोक १० ते ४० टक्केने वाढले.

एका अंदाजानुसार युद्धात आजवर एक लाख लोक मरण पावले असावेत. अडीच लाख लोक यावर्षीच विस्थापित झाले आहेत. युद्ध एका नाही, किमान ३० आघाड्यांवर चालू आहे. या विस्कळित रूपा-मुळे भिन्न ठिकाणचे लोक भिन्न प्रकारे ग्रस्त आहेत. सुमारे अडीच कोटींना - म्हणजे जवळ जवळ सगळ्याच लोकांना मदत आणि सुरक्षा आवश्यक आहे. युद्धाने निर्माण झालेल्या दुष्काळाने निम्म्याहून अधिक लोकसंख्येची - दीड कोटीहून जास्त - उपासमार होत आहे, त्यातील एक कोटींना अन्नाची त्वरित जरुरी आहे. पाच वर्षाखालील ४ लाख मुले उपासमारीने मरणासन्न आहेत. सैन्यात दोन्ही बाजू ११ व्या वर्षांपासून मुलग्यांना सैन्यात ओढतात. मुलींच्या लग्नाचे वय युद्धाआधी सरासरी १४ असे. ते या अनिश्चित काळात आणखी कमी होत आहे.

वर म्हटलेल्या अनेक रणांगणांपैकी सध्याचे एक महत्त्वाचे युद्ध मारीब नावाच्या प्रांतावरील नियंत्रणासाठी चालू आहे. त्या प्रांतात तेल आहे म्हणून दोन्ही बाजूंना तो हवा आहे.

येमेनवर युद्ध लादताना काही महिन्यातच हूथींचा पाडाव होईल आणि आपल्याला अनुकूल सरकार येमेनमध्ये आणता येईल असा सौदी आघाडीचा होरा होता. तसे झाले नाही. अमेरिकेतील नव्या राजवटीने आता सौदीचा पाठिंबा काढून घेतला आहे पण त्याबरोबर आवश्यक असणारी राजनैतिक हालचाल दिसत नाही. त्यामुळे मारीबसारखे संघर्ष चालूच रहातात व अधिक तीव्र होतात.

पश्चिमेचा या संदर्भातील दुटप्पीपणा उघड आहे. युद्धात दोन्ही बाजू वापरतात ती शस्त्रास्त्रे पश्चिमेतून येतात - प्रामुख्याने अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स. सापडलेल्या युद्धसामग्रीवरून [क्षेपणास्त्रांच्या तुकड्यांवरील त्याचा क्रमांक व तांत्रिक माहिती] हे सरळ दिसते. सौदी पत्रकार जमाल खाशोगीच्या तुर्कस्तानातील हत्येनंतर बऱ्याच पाश्चात्य देशांनी [स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क, फिनलंड, वगैरे] सौदीला शस्त्रास्त्रे पुरवणे बंद करणार असे जाहीर केले पण ती बंदी काही लगेच अमलात आली नाही किंवा संपूर्णत: येणारही नाही. कारणे तांत्रिक असोत [कंत्राटातील तरतुदीनुसार ते एकतर्फी रद्द करता न येणे, वगैरे], व्यापारी असोत. उदा, स्पेनने विशिष्ट प्रकारचे बॉम्ब सौदीला निर्यात करणार नाही असे जाहीर केले. पण सौदीला पाणबुड्या निर्यात करण्याचे आगामी कंत्राट हातातून जाईल या भीतीने ती बंदी लगेच उठवली. एकीकडे युद्धासाठी हत्यारे पुरवायची आणि प्रचंड पैसे मिळवायचे; दुसरीकडे येमेनच्या बळींबाबत नक्राश्रू ढाळायचे, प्रसंगी संयुक्त राष्ट्रसंघामार्फत किंवा स्वयंसेवी संघटनांमार्फत माफक मदतही करायची असा हा दुटप्पीपणा आहे.

**निरीक्षण**

थोडक्यात, जोपर्यंत पश्चिम शस्त्रास्त्रांचा पुरवठा बंद करत नाही, तोपर्यंत सौदी युद्ध चालू ठेवणार. त्यांना हवे तसे [सुन्नी] सरकार जरी येमेनमध्ये आले, तरी ते लोककल्याणकारी असेल याची शाश्वती नाही. ते सर्वसमावेशकही नसेल [शिया बाहेरच रहातील]. तसे सरकार येण्यापर्यंतचा अवधी आजमितीला जनतेला परवडण्यासारखाही नाही. एक संपूर्ण पिढी या अनावश्यक युद्धात आणि उपासमारीने बरबाद व्हायला लागली आहे. अगदी सौदीला अनुकूल राजवट आलीच तर, एक दाट शक्यता म्हणजे, आज या मानवी वेदनेला

**(पान ३६ वर)**

(जगभर : पान ३४ वरून)




आंतरराष्ट्रीय मीडियातून, संघटनांतून जी वाचा फुटते आहे त्यावर दमनशाही राजवट बंदी घालेल. वेदना कायम राहील पण ती जगासमोर येणार नाही.

**म्यानमार**

म्यानमारविषयी मागील महिन्याच्या अंकात लिहिले होते. लष्कराने एक फेब्रुवारीला निर्वाचित सरकार बरखास्त करून सत्ता हाती घेतली. म्यानमारच्या ज्येष्ठ नेत्या सू की व त्यांच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध केले. त्याविरुद्ध लोक प्रचंड संख्येने रस्त्यावर आले व लष्कराने सत्ता परत संसदेला द्यावी अशी मागणी करू लागले. हे निषेध तेव्हापासून अव्याहत चालू आहेत आणि देशाच्या विविध भागात पसरत आहेत. प्रथम त्यांच्याविरुद्ध हिंसक कारवाई झाली नाही. आता मात्र लष्कर हिंसक बनत आहे. आजवर २२४ निदर्शक गोळीबारात मृत्यू पावले आहेत. एकाचा पोलीस कस्टडीत हाल झाल्याने तेथे मृत्यू झाला. याविरुद्ध संतापाच्या लाटा उमटत आहेत व निषेध तीव्र होत आहेत. इंटरनेटवर बंदी, मीडिया फक्त सरकारमान्य यामुळे लष्करशाहीची एरवी ज्ञात असलेली ओळख होत आहे.

युरोपिअन युनिअन म्यानमारवर आंतरराष्ट्रीय निर्बंध घालण्याच्या बेतात आहे. त्यामुळे आधीसारखाच तो देश परत जागतिक प्रवाहाबाहेर जाईल. जनतेच्या दृष्टीने हे दुहेरी संकट. आधीच सरकार लोकांविरुद्ध आहे आणि दमन वाढत आहे त्यात नोकऱ्या, व्यवसाय जाण्याची शक्यता निर्माण होणार. एका अनिश्चित गर्तेत देश चालला आहे असे दिसते.

http://www.art-non-deco.com
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk